२०००/२००१ ५० बुके

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

№ 004222

जावक नंबर/"नगररचना"/ बिपी ३५१/२७४

दिनांक १८/०७/२००२

## इमारत बांधकामाचा वापर करणे बाबतचा दाखला (पूर्ण/~~अंशतः~~)

श्री. नितिन राजमल सांचेती

अंबड खुर्द, नाशिक

संदर्भ : तुमचा दिनांक १९/०९/२००१ चा अर्ज क्रमांक : बी-४/बी-१३४

महाशय,

दाखला देण्यात येतो की, अंबड खुर्द शिवारातील सि.स.नं. —
सर्व्हे नं. २२९/२५ प्लॉट नं. ७, ८ व १६,१७,१ मधील इमारतीच्या तळमजला
मजल्याचे इकडील बांधकाम परवानगी नं. बिपी/बी-२/८४२ दिनांक ८/१०/२००० अन्वये
दिल्याप्रमाणे सर्व्हेक्षक (आर्किटेक्ट) श्री. अशोक जमादार, नाशिक
यांचे निरिक्षणाखाली पूर्ण झाली असून निवासी/निवासेत्तर/शैक्षणिक कारणासाठी खालील शर्तीस अधिन राहून इमारतीचा वापर करणेस परवानगी देण्यात येत आहे. त्याचे एकूण बांधकाम क्षेत्र १३६.३७ + २३०.१२ चौ.मि. व चटई क्षेत्र (कारपेट एरिया) १२१.०४ + २०३.८३ चौ.मि.

१) सदर इमारतीचा वापर निवासी/निवासेत्तर/शैक्षणिक कारणाकरीताच करता येईल त्या वापरात बदल करता येणार नाही. वापरात बदल करावयाचा झाल्यास इकडील कार्यालयाची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

२) घरपट्टी आकारणीसाठी अलाहिदा प्रत म्प्र. कर अधिक्षक घरपट्टी विभाग यांचेकडे पाठविण्यात आली आहे तरी संबधीत विभागाकडे संपर्क साधावा.

३) सिंगल फेज विज पुरवठा करणेस हरकत नाही.

४) सदरच्या पूर्ण केलेल्या इमारतीत म.न.पा. च्या पूर्व परवानगी शिवाय वापरामध्ये व बांधकामामध्ये बदल करु नये.

कार्यकारी अभियंता

नगररचना,

नाशिक महानगरपालिका, नाशिक

Scanned with CamScanner

५. ५. २९ ५
३०. ९. ९९

१) श्री ललीत राजमल तंबोली ____ यांचा दि. ____ चा अर्ज
२) म. सहाय्यक संचालक, (म.न.पा.) नगररचना विभाग, नाशिक यांचे कडिल पत्र क्रमांक जा.क्र.नमपा/नर/बिनशेती/१४७/२९९३
३) दि. २१. ८. ९७.

22 [illegible]

जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
क्र.महा./कक्ष-३/बि. शे. प्र. क्र./२०७/९९
नाशिक दिनांक / १२/ १९९९.
23 DEC 1999

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ कलम ४४ प्रमाणे व त्या खालील नियमान्वये श्री. ललीत राजमल तंबोली ____ राहणार नाशिक तालुका नाशिक जि. नाशिक मधील मौजे आंबड खुर्द नाशिक जिल्हा नाशिक ____ येथील स.नं. २२९/२ब ना. ज. क. म. क्षेत्रातील २ ते १९ पैकी क्षेत्र ४०००/- चौ. मी. (अक्षरी क्षेत्र चार हजार चौ. मि. मात्र चौ. मी.) निवासी ____ या कारणासाठी अकृषिक प्रयोजनासाठी परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ व त्या खालील नियम व महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियमास (सुधारीत १९७९ चे) अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

सदरहू परवानगी ही नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ ला अधिन राहून देण्यात येत आहे.

परवानादार यांनी आदेशातील प्लॉटचे व सर्व प्लॉटचे विभाजन म. जिल्हाधिकारी यांचे पूर्व संमतीशिवाय करु नये.

परवानादार यांनी सदरहू जमीन व त्या वरील बिल्डींग अथवा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिली आहे त्याच कारणासाठी करावा. तसेच सदरहू जमिनीचा किंवा सदरहू जमिनीपैकी काही भागाचा अथवा त्यावरिल बिल्डींगचा अथवा बांधकामाचा उपयोग दुसऱ्या कारणासाठी करावयाचा झाल्यास त्यास म. जिल्हाधिकारी, नाशिक यांची लेखी पूर्व संमती घ्यावी. याच कारणासाठी बिल्डींगचा उपयोग हा संपुर्ण जमिनीचा उपयोग म्हणून मानन्यात येईल.

परवानादार यांनी हा आदेश दिलेल्या तारखेपासुन एक वर्षाच्या आत जमिनीची सूधारणा, मंजूर ले आऊट लेआऊट प्रमाणे म्हणजे रस्ते, ड्रेनेज इ. कराबी की, ज्यामुळे जिल्हाधिकारी व संबंधित नगरपालिका यांची संमती राहील, त्याप्रमाणे सदरहू ले आऊटमधील प्लॉटची मोजणी व रेखांकन सर्व्हे खात्याकडून करुन घ्यावी व जोपर्यंत जमिनीची सुधारणा होत नाही तोपर्यंत त्यामधील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही तऱ्हेने लावु नये.

परवानदार यांनी सदरहू जमिनीतील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही तऱ्हेने लावली तर परवानादार यांची जबाबदारी राहील की, सदरहू प्लॉटची विक्री किंवा विल्हेवाट ही आदेशातील शर्तीस अधिन राहून अथवा सनदेमधील शर्तीस अधिन राहुन करावी.

सदरहू परवानगी ही देखाव्याच्या नकाशामध्ये दाखविल्या प्रमाणे ओट्यावर बांधकामाप्रमाणे किंवा प्लॅनमध्ये दाखविल्यप्रमाणे बांधावयाचे बिल्डींगप्रमाणे करण्यास देण्यात येत आहे. प्लॅनमध्ये दाखविल्यप्रमाणे मोकळी जागा ठेवावी.

ही परवानगी बिल्डींगचे बांधकामाबाबत ---- यांचे कडील पत्र क्र. ---- ---- मधील शर्तीस अधिन राहुन देण्यात येत आहे.

परवानगीदार यांनी संबंधित महानगरपालिका / नगरपालिका / सहाय्यक संचालक / ग्रामपंचायत / नगररचना यांचेकडून योग्य ती बांधकामाची परवानगी घेतल्यावरच बांधकामास सुरुवात करावी. सदरहू अट ही परवानगीदार यांचेवर बंधनकारक आहे.

परवानगीदार यांनी बिल्डींग प्लॅन हे संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूर करुन घ्यावेत. ज्या ठिकाणी सक्षम अधिकारी नाहीत अशा वेळी परवनगीदार यांनी महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी) नियम १९६९ अनुसूची ३ प्रमाणे प्लॅन तयार करुन घेऊन तो. म. जिल्हाधिकारी यांचेकडून मंजुर करुन त्याप्रमाणे बांधकाम करावे.

परवानादार यांनी राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा मार्ग यामधील रस्त्याची सिमा व इमारतीची रांग यामधील व इमारतीची रांग या नियंत्रण रेषा या मधील रस्त्यापासूनचे अंतर महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी) नियम १९६९ अनुसुची २ प्रमाणे ठेवावी.

परवानदार यांनी हा आदेश दिल्याचे तारखेपासुन एक वर्षाचे आत अकृषिक प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावा अन्यथा अकृषिक परवानगीची मुदत जिल्हाधिकारी यांचेकडून वेळोवेळी वाढवुन घ्यावी तसे न केल्यास परवानगी रद्द समजण्यात येईल.

परवानदार यांनी अकृषिक प्रयोजन करिता जमिनीचा उपयोगात सुरु केल्याबाबत अथवा उपयोगात बदल केल्याबाबत एक महिन्याचे आत संबंधित तलाठी / तहसिलदार / जिल्हाधिकारी नाशिक यांना कळवावे. अन्यथा परवानादार यांचे विरुध्द महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६६ (६) प्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

Scanned with CamScanner

१२) परवानादार यांनी जमिनीचा अकृषिक सारा दर ... रु. ... प्रमाणे ज्या अकृषिक कारणासाठी ... दि. ३१/७/९१ पर्यंत ... दिली आहे त्या कारणासाठी आणल्याचे तारखेपासून भरावा अकृषिक दर ... भरण्याच्या अटीवर सदर परवानगी देण्यात येत आहे. व १/८/९६ पासुन सुधारीत अकृषिक दराने येणाऱ्या फरकाची रक्कम भरावा किंवा कोणत्याही परिस्थितीत जास्तीत जास्त ...

१२अ) परवानादार यांनी अकृषिक साऱ्याचे तीनपट रुपांतरित कर तातडीने भरावा किंवा ... परवानगी रद्द समजण्यात येईल. मिळाले पासून दहा दिवसाचे आत भरावा. तसे करण्यास चुकल्यास अकृषिक परवानगी रद्द समजण्यात येईल.

१३) सदरहू आदेशामधील नमुद केलेल्या अकृषिक सारा व सनदेमधील अकृषिक सारा ज्या ज्या वेळेस अकृषिकसारा बदलेल त्या सारा बदलणेवर राहील.

१४) परवनादार यांनी मोजणी फी जमिनीचा उपयोग अकृषिक कारणासाठी उपयोगात आणलेपासून एक महिन्याचे आत भरावी.

१५) म. जिल्हानिरीक्षक भूमी अभिलेख यांनी जमिनीची मोजणी ... मोजणीप्रमाणे जमिनीचे क्षेत्रात व अकृषिक साऱ्यात झाल्यास त्याप्रमाणे क्षेत्र व सारा बदलता राहील.

१६) परवानादार यांनी जमिनीचा अकृषिक कारणासाठी उपयोग सुरु केल्यापासुन तीन वर्षाचे आत बिल्डिंग व इतर बांधकाम करावे. सदरहू कालावधी म. जिल्हाधिकारी यांना शासकिय आदेशाप्रमाणे परवानेदार यांचेकडून दंड व नजराणा रक्कम घेऊन वाढवून देण्यात येईल.

१७) परवानदार यांनी बिल्डिंग व इ. बांधकामे पूर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढीव बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदलपूर्व परवानगी व सदरहू बांधकामाचे प्लॅन व जिल्हाधिकारी / सहाय्यक संचालक नगररचना / महानगरपालिका / नगरपालिका / यांचे कडून मंजूर घेतल्या शिवाय करु नये.

१८) परवानादार यांचेवर महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ चे अनु... किंवा ५ मध्ये नमुद केलेल्या शर्ती व नमुन्यामध्ये सनद बिनशेती उपयोग केल्यापासून एक महिन्याचे आत करुन देण्याचे बंधन राहील.

१९) परवानदार यांचेकडून या आदेशात नमुद केलेल्या शर्तीचा अगर सनदेमध्ये नमुद केलेल्या शर्तीचा भंग केल्यास महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमान्वये म. जिल्हाधिकारी जो दंड व सारा पर्मावतील त्याप्रमाणे दंड भरुन घेऊन त्यांना जमिनीचा अकृषिक कारणासाठी उपयोग पुढे चालू ठेवता येईल.

१९अ) शर्त क्र. १९ अ काहीही शर्ती नमुद केल्या असल्या तरी सुध्दा जिल्हाधिकारी यांना या परवानगीचे विरुध्द बिल्डिंग बांधकामे केली असल्यास किंवा ते वापरून किंवा त्यामध्ये बदल केला असल्यास ते उचविक मुदतीत काढून टाकण्यास कायदेशीर अधिकार राहील व सदरहू मुदतीत परवानादार यांनी तसे न केल्यास म. जिल्हाधिकारी हे सदरहू बांधकाम टाकतील व ते बांधकाम काढून टाकण्याचा खर्च परवानादार यांचेकडून जमिन महसूलाची बाकी म्हणून वसुल करतील.

२०) सदरहू परवानगी ही इतर कायद्यामधील तरतुदीस अधिन राहून व सदरहू प्रकरणी त्या कायद्याच्या लागू असलेल्या अधिन राहुन म्हणजे मुंबई कूळ कायदा आणि शेतजमिन अधिनियम १९४८ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व ... अधिनियम इ. चे तरतुदीस अधीन राहून देण्यात येत आहे.

सही/- x x x

जिल्हाधिकारी,

प्रति,

श्री. ललीत राजमल सवंती,

राहणार शिवाजीनगरी कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक-५.

प्रतिलीपीने : म. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिकरोड यांजकडेस माहितीसाठी सविनय सादर

प्रत - मुळ कागदपत्र पान क्र.१ ते ७५ सह म. तहसिलदार नाशिक यांचेकडेस माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषीत

२) त्यांना विनंती करण्यात येते की, परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर केल्याबाबत लक्ष ठेवावे परवानादार अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यनंतर तालुका फार्म नं. ०२, गा.न.नं. ०२, अकृषिक नोंद वहीमध्ये बिनशेती साऱ्याबाबत योग्य ती नोंद घ्यावी. परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता वापरलेल्या तारखेपासुन या दृष्टिने काळजी घ्यावी व योग्य त्या नमुन्यामध्ये सनद करुन घ्यावी परवानादार यांनी मोजणी फी भरल्यास म. जिल्हा ... अभिलेख नाशिक यांना त्याप्रमाणे कळवावे व संबंधित/जमिनीचा प्लॅन व ७/१२ चे उतारे सोबत पाठवावेत.

टीप - परवानदार यांनी रुपांतरीत कर रक्कम रु. ९४००/- सरकारी खजिन्यात ता. २०. १२. ९९ रोजी चलनाने भरुन मोजणी फी रु.२२००/- दि. ९. १२. ९९ रोजी चलनाने भरुन त्याची चलने हजर केली आहेत.

प्रत - १) म. जिल्हा निरीक्षक भुमि अभिलेख नाशिक यांचेकडे माहितीसाठी अग्रेषीत.

२) म. सहाय्यक संचालक नगररचना नाशिक यांचेकडे माहितीसाठी अग्रेषीत.

३) म. आयुक्त महानगरपालिका नाशिक.

४) म. तलाठी आंबड ...

५) म. नगर भूमापन अधिकारी नाशिक.

६) म. उपविभागीय अधिकारी नाशिक, उपविभाग नाशिक

COLLECTOR OF NASHIK

जिल्हाधिकारी नाशिक

N. A order

Scanned with CamScanner

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका कार्यालय,

जा.क्र. / नगररचना विभाग / अंतीम //२१७/७०१ / ८

दिनांक ११ / ८ / २००० 

प्रति, श्री- ललित राजमल संचेती व इ. कु.मु. श्री सहित फत्तेचंद मुथा.
द्वारा- श्री. जी. व्ही. कलांटे, आर्कि. नाशिक.

विषय:- आनंद खुर्द शिवारातील स.नं. / गट नं. २२३ / २ ब मोजणी नकाशाप्रमाणे. व ७।१२ उताऱ्याप्रमाणेचे जागेतील प्लॉट नं. ११ ते १९ चा लेआऊट नकाशा अंतीम मंजूरी करणेबाबत

संदर्भ:- तुमचा दिनांक १४ । ७ । २००० चा अर्ज व नकाशे.

महाशय,

वरील संदर्भान्वये कळविण्यात येते की, आनंद खुर्द शिवारातील ग.नं. २२३/२ ब मोजणी नकाशा प्रमाणे व ७।१२ च्या उताऱ्याप्रमाणे जागेतील नियोजित लेआऊटचा नकाशा तांत्रिक दृष्ट्या असल्याने त्यास इकडील जा. क्र. एल. एन. डी. / डब्ल्यू एस. / २१४ /२५६३ — / — / दिनांक २१.०८.९७ अन्वये टेंटटिव्हली मंजूरी शर्त नंबर ०१ ते १३ अनुसार मंजूरीदेणत आली होती. त्यानंतर तुम्ही सदर शर्तीनुसार सदर नियोजित लेआऊट प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर मोजणी करून, प्लॉटस रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे कायमचे दगड रोवून सदर कॉलनी मध्ये कॉलनी रस्ते तयार करून दिले आहे त्याच प्रमाणे पाईप लाईन करीता रक्कम रुपये ५१,५८०/— पावती क्र. / बुक क्र.27/0078 दिनांक ११ / ०८ / २००० अन्वये या कार्यालयात भरलेली आहे.

सबब तुम्ही सदर नियोजित टेंटटिव्हली मंजूर लेआऊटचे शर्तीनुसार योग्य ती पूर्तता केलेली असल्याने सदर जागेतील लेआऊटच्या नकाशास अंतिम मंजूरी (फायनल लेआऊट) खालील शर्तींवर देण्यात येत आहे.

## – शर्ती –

१) सदर कॉलनीतले प्लॉट, रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे दगड हालवू नये व मंजूर लेआऊट प्रमाणे कोणतेही प्लॉटचे क्षेत्र जागेवर प्रत्यक्ष मोजले असता कमी अधिक भरता कामा नये.

२) मंजूर लेआऊट मधील कोणत्याही प्लॉटचा उपयोग फक्त राहणेसाठी करावा. अन्य कोणताही वापर या कार्यालयाची परवानगी घेतले शिवाय करू नये

३) मंजूर लेआऊट मधील कोणतेही प्लॉटचे पाडून उपविभाजन करणे किंवा एकत्रीकरण करणे झाल्यास इकडील पुर्व परवानगीशिवाय करू नये

४) मंजूर लेआऊटमधील प्लॉटमध्ये बांधकाम करणेपूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी (बांधकाम परवानगी) घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करू नये.

५) सदर कॉलनी मध्ये तुम्ही पाण्याची लाईनसाठी रक्कम भरलेली असली तरी म. न. पा. ची सदर भागातील पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्याखेरीज पुर्ण कॉलनीत पाणी पुरवठा केला जाणार नाही.

६) मंजूर लेआऊट मधील रस्ते व खुल्या जागा नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात दिनांक १३.०३.२००० ह्या खुल्या जागेचे क्षेत्र ८०० =०० चौ मीटर करारान्वये भरलेले आहे.

७) सदर लेआऊटमध्ये आपण पथदीपांची व्यवस्था विद्युत विभाग पथक नाशिक /२०९ / कॉलनी / १९८८/१३९ / दिनांक १३.५.२००० अन्वये केलेली असून सुपरव्हिजन चार्जेस रक्कम रुपये ५,८३१=०० पावती क्र ००१ बुक क्रमांक ४३५ दिनांक ०५.११.९९ अन्वये भरलेली आहे